शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालयातील औषधोपचारासाठी व तपासणी सुविधांसाठी आकारण्यात येणारे सुधारित रुग्णशुल्क दर.

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

**शासन निर्णय क्रमांकः वैशिवि-२०१७/प्र.क्र.१९१/प्रशा-२**

**नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.**

**दिनांक: २० नोव्हेंबर, २०१७.**

संदर्भ:- १) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.सवैशिवसं/रुग्णशुल्क /सुधारणा/१-फ/१७, दि.१/४/२०१७ व दि.२८/४/२०१७

२) शा.नि. वै.शि.व औ.द्र.विभाग, क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३८८/प्रशा-२, दि.४/७/२०१७.

३) वै.शि.व.औ.द्र.वि. पत्र क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.६९/प्रशा-२, दिनांक २६/०६/२०१५

४) शा.नि. सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.४६२/भाग-२/आरोग्य ३, दि.२८/१२/२०१४.

५) शा.नि. वै.शि.व औ.द्र.विभाग, क्र.एमआयएस-२००६/३०५/सीआर३३/०६/प्रशा-२, दि.३०/१२/२०१०.

**प्रस्तावना :**

शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालयांतील औषधोपचार तसेच निरनिराळया वैद्यकीय सुविधांसाठी आकारण्यात येणारे शुल्क दि.३०/१२/२०१० च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आले होते. सदर शुल्क निश्चिती होऊन ६ वर्षाचा कालावधी झाल्याने या शुल्क दरांमध्ये सुधारणा किंवा शुल्क जैसे थे ठेवण्यासाठी शिफारस करण्यासाठी संदर्भीय पत्र क्र.५ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. याअनुषंगाने वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयामधील विविध विषयावरील तज्ञांची समिती गठीत केली होती. तसेच नागपूर, औरंगाबाद व पुणे येथील अधिष्ठाता यांच्याकडून दरांबाबत शिफारशी मागविण्यात आल्या होत्या.याअनुसार तज्ञांकडून प्राप्त झालेल्या शिफारशी व खालील मुद्दे विचारात घेण्यात आल्या आहेत:-

अ) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग या दोन विभागांच्या समान तपासण्या/उपचारांसाठी आकारण्यात येणाऱ्या रुग्ण शुल्कात तफावत राहू नये.

आ) उपचार/तपासण्या करण्यासाठी लागणाऱ्या अद्यावत व किंमती यंत्रसामुग्रीची खरेदी. त्यांची देखभाल व दुरुस्ती यासाठी येणारा खर्च,सुटे भाग व लागणाऱ्या खर्चिक बाबीवरील खर्च.

इ) शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयांमध्ये अनेक जिल्ह्यामधून गोरगरीब व गरजू रुग्ण उपचारासाठी येत असल्याने त्यांना परवडतील असे दर.

उपरोक्त बाबी विचारात घेऊन शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालयांमध्ये उपचार/तपासण्या यासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णयः-</u>

राज्यातील शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालयांतील औषधोपचारासाठी तसेच निरनिराळ्या वैद्यकीय उपचार व तपासणी सुविधांसाठी सोबतच्या विवरणपत्रात नमूद केल्यानुसार सुधारित शुल्क आकारण्यास याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

०२. तसेच या विभागाच्या संदर्भीय दि.०४/०७/२०१७ च्या आदेशान्वये विहीत केलेल्या लाभार्थींना मोफत उपचार/तपासण्या करण्यात येतील.

०३. संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांनी सदर शासन निर्णय सर्व संबधितांच्या निदर्शनास आणावे व अनुषंगिक कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

०४. हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्रकाश सुरवसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, वाळकेश्वर मार्ग, मलबार हिल, मुंबई - ४०० ०३५.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३) मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
४) मा.मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
५) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई - ४०० ०२१.
६) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान भवन, मुंबई - ४०० ०२१.

७) मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
८) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
९) मा.अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई.
१०) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई.
११) मा.प्रधान सचिव (वि.सु.), वित्त विभाग यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई.
१२) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे स्वीय सहायक. मंत्रालय, मुंबई.
१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१५) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर.
१६) सर्व विभागीय आयुक्त.
१७) सर्व जिल्हाधिकारी
१८) सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी (सर्व), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये, महाराष्ट्र राज्य. (संचालकांमार्फत)
२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२१) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
२२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई
२३) अ.स./क.अ. (वि.सु.)(व्यय-१३) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
२४) निवडनस्ती (प्रशासन-२).

08/12/2017
Dental College
Vaibhav N-Rane